नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०८/२०२५ (बुधवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, ४० लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त, १ आरोपी अटक कुही पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कुही :— दिनांक ०६/०८/२०२५ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा चांपा टोल नाका येथे नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली असता टिप्पर क्रमांक एम.एच. ४९ बी. झेड १७१७ हे वाहन मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक आसिन खॉन अब्बास खॉन, वय ३४ वर्षे, रा. प्लॉट क्रं ८०, नविन खरबी, ता.जि. नागपुर हा मिळुन आल्याने त्याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव विचारले असता सदर वाहन त्याचेच मालकीचे असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्रमांक एम.एच. ४९ बी. झेड १७१७ किमती ४०,००,००० /— रूपये व २) १० ब्रास रेती किंमती ६०,०००/— रूपये आणि असा एकुण ४०,६०,०००/— रूपयेचा माल जप्त करण्यात आला.

नमुद वाहन चालक/मालक आरोपी नामे आसिन खॉन अब्बास खॉन, वय ३४ वर्षे, रा. प्लॉट क्रं ८०, नविन खरबी, ता.जि. नागपुर याचे विरूध्द पोस्टे कुही येथे कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## पोलीस स्टेशन रामटेक हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ६ गुन्हे नोंद स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक ०५/०८/२०२५ रोजी श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, रामटेक येथे विविध ठिकाणी सट्टापट्टी सुरू आहे. अशी माहीती मिळताच श्री अनिल म्हस्के यांनी तात्काळ स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे पथक कारवाई कामी रवाना केले. मिळालेल्या माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने खालील प्रमाणे कारवाई करून ६ गुन्हे नोंद केले.

**कारवाई क्रमांक १ :—** पोलीसांनी नगरधन शिवार मॉ दुर्गा चौक,०८ किमी दक्षिण येथे जावुन धाड टाकली असता **आरोपी क्रं १) मंगेश दशरथ कामडी, वय ३३ वर्ष, वार्ड क्र.४ नगरधन, ता. रामटेक, जि. नागपुर सट्टापट्टी चालवितांना मिळुन आला. आरोपीला अधिक विचारपुस केली असता पाहीजे आरोपी क्रं २) नामे बबलु फुलबांधे, रा. आंबाळा रामटेक** याच्या सांगण्यावरून तो सट्टापट्टी चालवित असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन रोख रक्कम ५,२५०/— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहीत्य , दोन ॲन्ड्रॉईड मोबाईल असा एकुण ३०,२५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवाई क्रमांक २ :—** पोलीसांनी संतोष यांचे चहाचे दुकानाचे मागे मनरस चौक,येथे जावुन धाड टाकली असता **आरोपी नामे हरीपाल मानाजी नारनवरे, वय ४९ वर्ष, वार्ड क्र.५ मनसर, ता. रामटेक, जि. नागपुर** सट्टापट्टीचे आकडे लिहतांना मिळुन आला. पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन रोख रक्कम २,३६० /— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहीत्य असा एकुण २,३६५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवाई क्रमांक ३ :—** पोलीसांनी अगरबत्ती प्रकल्प जवळ रामटेक,येथे जावुन धाड टाकली असता **आरोपी क्रं १) नामे लिकेश दयालराव रामटेके , वय ३८ वर्ष, नेहरू वार्ड, रामटेक, जि.नागपुर सट्टापट्टीचे आकडे लिहतांना मिळुन आला. आरोपीला अधिक विचारपुस केली असता पाहीजे आरोपी क्रं २) नामे जयकिशन कुशव्हा, रा. रामटेक** याच्या सांगण्यावरून तो सट्टापट्टी चालवित असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन रोख

रक्कम २,०१०/— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहीत्य असा एकुण २,०१५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवाई क्रमांक ४ :—** पोलीसांनी रामटेक ते मौदा रोडवरील भोजापूर शिवारातील गारवा बार जवळ, येथे जावुन धाड टाकली असता आरोपी नामे **सुरेश उर्फ मोटु शामराव बर्वे, वय ३७ वर्ष, आझाद वार्ड, रामटेक, जि. नागपुर** सट्टापट्टीचे आकडे लिहतांना मिळुन आला. पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन रोख रक्कम २८६० /— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहीत्य असा एकुण २८६५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवाई क्रमांक ५ :—** पोलीसांनी मौजा मच्छी मार्केट, येथे धाड टाकली असता आरोपी क्रं **१) नामे ज्ञानेश्वर शामराव क्षीरसागर, वय ४५ वर्ष, रा. महात्मा फुले वार्ड रामटेक सट्टापट्टीचे आकडे लिहतांना मिळुन आला. आरोपीला अधिक विचारपुस केली असता पाहीजे आरोपी क्रं २) नामे बबलू तुलाराम सोनकुसरे रा. महात्मा फुले वॉर्ड रामटेक**,याच्या सांगण्यावरून तो सट्टापट्टी चालवित असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन रोख रक्कम १५९०/— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहीत्य असा एकुण १५९५ /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवाई क्रमांक ६ :—** पोलीसांनी मौजा शितलवाडी येथे जावुन धाड टाकली असता **आरोपी क्रं १) नामे निलेश बाळकृष्ण नान्हे वय ३० वर्षे शनिवारी वार्ड रामटेक सट्टापट्टीचे आकडे लिहतांना मिळुन आला. आरोपीला अधिक विचारपुस केली असता पाहीजे आरोपी क्रं २) नामे महेश बरगट आंबेडकर वॉर्ड रामटेक** याच्या सांगण्यावरून तो सट्टापट्टी चालवित असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन रोख रक्कम २५१०/— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहीत्य असा एकुण २५१०/— रूपयांचा मुद्देमाल केला आहे.

**नमुद कारवाईत एकुण ४१,६०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद **१० आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये ६ गुन्हे नोद करण्यात आले आहे.**

# अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या/विक्री/ वाहतुक करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, १४ गुन्हे नोंद एकुण ५,६६,६१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

**नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक ०५/०८/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री आणि वाहतुक करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू आणि वाहतुकीसाठी वापरलेले वाहन असा एकुण ५,६६,६१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन बेला येथे आरोपी क्रं** ०१) विशाल नामदेव बहादुरे, वय ४५ वर्ष, ०२) आकाश शंकर बन, वय २७ वर्ष, दोन्ही रा. धोंडगाव, ता.समुद्रपुर, जि. वर्धा,०३) पाहीजे आरोपी गोलु पाटील, रा. समुद्रपुर, जि. वर्धा यांचेवर **देशी दारू वाहतुक प्रकरणी गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे** हरीदार मोतीराम मांढरे ,वय ५० वर्ष रा चापेगडी ता कुही जि नागपुर याचेवर **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड** येथे कमलाकर शंकर शिरसाम, वय ४९ वर्ष, रा. मालापुर, ता. नरखेड याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे**, पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी क्रं १. प्रविन दशरथ मसराम, वय ३५ वर्षे, रा. भोरगड, ता. काटोल आणि २. ईशबु बुल्लु खान, वय ६५ वर्षे, रा. सोनखांब यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे जिवन शंकर कोल्हे वय ५० रा नवीन वस्ती खापा, ता. सावनेर जि. नागपुर. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे १. प्रज्वल सिध्दार्थ पक्कीडे, वय २७ वर्ष, रा. पाटणसांवगी वार्ड, क्र ०५, बाजार चौक सावनेर, २. गणेश गंगाराम अवजेकर, वय ५६ वर्ष, रा. वार्ड क्र १४, चिचपुरा सावनेर आणि ३. अभिषेक मारोती मोहोड, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र ०५, पाटनसावंगी, ता. सावनेर, यांचेवर **प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे . पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे ऋषी योगेश्वर चरडान, वय ३९ वर्ष, रा. मोहपा याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन पारशिवणी** येथे आरोपी नामे गिरीधर दौलत निबोंने, वय ६० वर्ष,रा. नयाकुडं ता.पारशिवनी, याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे कपुरचंद अमरलाल वरखडे वय ४५ वर्ष रा नवेगाव चिचदा रामटेक याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे दोन महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे.

अशा **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १४ गुन्हे दाखल केले आहे.**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०५/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०६/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत उमरेड टाउन येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्रीमती वृष्टी जैन यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. बायपास चौक उमरेड येथे नाकाबंदी करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये उमरेड पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने